Impact Feature

# केजी ते पीएच.डी. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी के. के. वाघ संस्था

## उच्च शिक्षणाबरोबरच विद्यार्थीकेंद्रित विकासावर भर



### केजी ते पी. एचडीपर्यंतचे शिक्षण देणारी संस्था

**समीर बाळासाहेब वाघ**
अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्याप्रेरणेने १९७० साली के. के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना झाली. केजी ते पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण देणारी संस्था निर्माण झाली. गेल्या ५५ वर्षांच्या कालावधीत संस्थेने अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षणाच्या विकासावर लक्ष केंद्रित करून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर गुणवत्तापूर्ण संस्था असा नावलौकिक मिळविलेला आहे. संस्थेचा विकास अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रापुरता मर्यादित न राहता पारंपरिक शिक्षणाबरोबर फाइन आर्ट्स, परफॉर्मिंग आर्ट्स, शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व कृषी विज्ञान क्षेत्रात विविध ६ महाविद्यालये सुरू करून राज्यातील सर्वांत मोठी कृषी शिक्षण प्रदान करणारी संस्था म्हणूनही नावारूपास आली आहे. तसेच संस्थेंतर्गत इंग्रजी माध्यमाचे स्टेट बोर्ड व सीबीएसई बोर्ड शाळादेखील कार्यरत आहेत. सध्या संस्थेद्वारा ३० विविध महाविद्यालये, तंत्रनिकेतन, शाळा कार्यान्वित असून २३,००० विद्यार्थी व १,९०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संस्थेत कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे देशात व परदेशात ७१ हजाराहून अधिक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत. संस्थेचे दिवंगत अध्यक्ष व प्रेरणास्थान आदरणीय बाळासाहेब देवराम वाघ यांनी स्थापनेपासून विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून ५१ वर्षे संस्था खंबीरपणे उभी केली. कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक, के. के. वाघ फाउंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन, स्माईल व स्पिनॅच यांच्या संयुक्त विद्यमाने काकासाहेबनगर, भाऊसाहेबनगर, वऱ्हेदारणा, पालखेड, चांदोरी, सरस्वतीनगर कॅम्पस येथे मोफत नेत्र, हृदय व महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले व यावेळी २२४५ ग्रामस्थ व नागरिकांनी आरोग्य तपासणी केली. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून अभियांत्रिकी महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), नवी दिल्ली यांच्याकडून ऑटोनॉमस अर्थात स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद, बंगळुरू (नॅक) यांच्याकडून 'अ' श्रेणीच दर्जा प्राप्त आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीयस्तरावरील AICTE-CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास चार (४) वेळा 'सर्वोत्कृष्ट दर्जा' (Platinum Category) ने सन्मानित करण्यात आलेले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आयडीया लॅबसाठी अनुदान मिळवणारे के. के. वाघ हे पुणे विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय होय. आजमितीस अभियंत्रिकी महाविद्यालयाच्या सात (७) विभागांना एन.बी.ए मानंकन मिळाले आहे. यामध्ये कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक, सिव्हिल आणि एमसीए या विभागांचा समावेश आहे. तंत्रनिकेतन, नाशिकच्या सहा (६) विभागांना एनबीए मानांकन प्राप्त आहे. कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स



व मशीन लर्निंग अशा विविध शाखांमध्ये डिप्लोमा प्रदान करणारे तंत्रनिकेतन आहे. याशिवाय 'अ‍ॅडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी' हा औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणारा कोर्सही या तंत्रनिकेतन येथे उपलब्ध आहे.

अभियांत्रिकी व तंत्रशिक्षणात एक आदर्श निर्माण करून संस्थेने कृषी शिक्षणाच्या क्षेत्रातही कृषी महाविद्यालयांतर्गत कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन व उद्यानविद्या महाविद्यालय अशी ६ महाविद्यालये कार्यरत आहेत. आजपर्यंत संगीत, नाट्य, नृत्य यांसारखे कलागुणांना वाव देणारे शिक्षण हे केवळ मुंबई, पुणे या मोठ्या शहरांमध्ये उपलब्ध होते. मात्र आता के. के. वाघ कला अकादमी अंतर्गत फाइन आर्ट्स व परफॉर्मिंग आर्ट्स महाविद्यालय स्थापन करत अभिजात भारतीय कला जोपासली आहे. मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहे, गुरुकुल, बँकिंग, व्यायामशाळा, कॅन्टीन, ग्राहक भांडार, पार्किंग, बसव्यवस्था, सुरक्षा विभाग या सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेने निफाडच्या भाऊसाहेबनगर, काकासाहेबनगर, पिंपळस व चांदोरी येथे वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांची स्थापना केली. २०१९-२० हे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले आहे. या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम इंद्रधनुष्य, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, पर्यावरणपूरक गणेश कार्यशाळा, स्वच्छता अभियान, मान्यवर वक्त्यांची व्याख्याने, प्रोजेक्ट रॅली, माजी विद्यार्थी मेळावा नोव्हेंबर-२०१९, माजी विद्यार्थी महामेळावा-डिसेंबर २०१९, सी.ई.ओ. मीट २.० आदींसह अनेक उपक्रम राबवण्यात आले. आजवर कर्मवीर काकासाहेब वाघ व्याख्यानमालेंतर्गत ७५ पुष्पे नाशिक शहराच्या विविध कलादालनांमध्ये गुंफण्यात आले. त्याचप्रमाणे आदरणीय कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांचे स्मृतिप्रीत्यर्थ आजमितीस १९ पुष्पे गुंफण्यात आले. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध मल्टिनॅशनल उद्योग समूहातर्फे कॅम्पस ड्राइव्ह पार पडले. यामध्ये एकूण ६५० हून अधिक विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्णसंधी मिळाली आहे. यात सर्वाधिक २२ लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज तर सरासरी ४.५० लाख रुपयांचे पॅकेजचा समावेश आहे. अशातऱ्हेने विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाबरोबरच विद्यार्थीकेंद्रित विकासावर भर देत रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारी नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणून वाटचाल करत आहेत. असाच गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वारसा जपत खारघर, नवी मुंबई येथे के. के. वाघ इंटरनॅशनल स्कूलच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात पदार्पण केले आहे.